महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १३६ वा | दिनांक : २१/०२/२०२५ | वार : शुक्रवार

## शक्तीपीठ महामार्गाला १२ जिल्ह्यांतून विरोध

**कोल्हापूर** : शक्तिपीठ महामार्ग शेतकऱ्याला देशोधडीला लावणारा असून, हा महामार्ग रद्द व्हावा या मागणीसाठी १२ मार्चला विधानसभेवर भव्य मोर्चा काढणार असल्याचे विधान परिषदेतील काँग्रेसचे गटनेते आमदार सतेज पाटील यांनी जाहीर केले. शक्तिपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीच्या बैठकीत ते बोलत होते.

शक्तिपीठ महामार्ग बाधित १२ जिल्ह्यातील शेतकऱ्यांची राज्यव्यापी बैठक आमदार सतेज पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शाहू स्मारक भवन येथे पार पडली. यावेळी बोलताना त्यांनी, शक्तीपीठ महामार्गाच्या मुद्द्यावरून राज्य सरकारवर जोरदार टीका केली. राज्यात सत्तेत असणाऱ्या लोकांना कोल्हापूरची मोठी धास्ती होती, म्हणून कोल्हापूरपुरता महामार्ग रद्दचा निर्णय सत्तेतील काही मंत्र्यांनी जाहीर केला. मात्र याला कायदेशीर आधार नाही. सरकार मध्ये राहायचे आणि त्यांच्याच मंत्र्यांनी आणि आमदारांनी वेगवेगळी स्टेटमेंट करायचे हे सरकारच षड्यंत्र असल्याची टीकाही आमदार सतेज पाटील यांनी केली.

गोव्याकडे जाण्यासाठी पर्यायी रस्त्या असताना सुद्धा शक्तिपीठ का लादला जाते आहे? ८६ हजार कोटींचा हा प्रकल्प असल्याचे सांगण्यात येत आहे. एवढी मोठी रक्कम पाहता एका किलो मीटरसाठी ११० कोटींचा खर्च येणार आहे. शक्तिपीठमध्ये कोणी फितूर होऊ नये यासाठी काळजी घेऊया. न्यायालयात जाण्याऐवजी ही लढाई रस्त्यावर करुया, असेही सतेज पाटील म्हणाले.

येणाऱ्या अधिवेशनात महाविकास आघाडी म्हणून आम्ही सर्व जण ताकतीने प्रश्न मांडू. आपापल्या जिल्ह्यातील आमदारांचे महामार्गाविरोधाबाबत पत्र घ्या. शेतकऱ्याला देशोधडीला लावणारा हा प्रकल्प असून अर्थसंकल्पीय अधिवेशन काळात १२ मार्चला भव्य मोर्चा काढण्याचेही आमदार सतेज पाटील यांनी यावेळी जाहीर केले. शेतकऱ्यांची ताकत सरकारला दाखऊन देऊ.. मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी व्हा, असे आवाहनही त्यांनी केले.

ठाकरे गटाचे कोल्हापूर सहसंपर्क प्रमुख विजय देवणे म्हणाले, शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात शेतकऱ्यांच्या भावना तीव्र आहेत. आता या लढ्याला कोल्हापुरातून सुरुवात झाली आहे. कोणत्याही अधिकाऱ्याला रस्त्यावर फिरू देणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांना अभिप्रेत राज्य, महायुती सरकारला चालवायचे होते. मात्र शेतकऱ्यांवर अन्याय सुरू आहे. हे सरकार गोरगरीब लोकांना मदत करणारे नाही. कधीही पोट न भरलेली माणसे मंत्री मंडळात आहेत. त्यांना सर्व सामन्यांशी देणे घेणे नाही, अशी टीकाही त्यांनी केली.

शक्तिपीठ महामार्ग विरोधी संघर्ष समितीचे समन्वयक गिरीश फोंडे म्हणाले, सामाजिक न्यायासाठी कोल्हापूर भूमी ओळखले जाते. शक्तिपीठ महामार्गाला होणारा विरोध पाहून सत्ताधीश हादरले आहेत. राज्यातील १० जिल्ह्यांतून शक्तिपीठ महामार्गाला विरोध आहे. एकाही आमदारासोबत बैठक झाली नसताना बैठक झाल्याचे मुख्यमंत्री खोटे सांगत असून शेतकऱ्यांचे शेतजमिनी काढून घेण्याचे काम सरकार करत असल्याचा आरोप केला. भाजपचे कोण कंत्राटदार आहेत त्यांच्या नावा निशी त्यांचा भांडाफोड करण्याचा इशाराही गिरीश फोंडे यांनी दिला.

लातूर जिल्ह्यातील गजेंद्र यळकर म्हणाले, शेतकऱ्यांच्या जमिनी लुबाडल्या जात आहेत. नदीजोड सारखे प्रकल्प द्या, बागायती जमिनीवर आरक्षण टाकणारे प्रकल्प नको, अशी मागणी केली.

सोलापूर येथील शेतकरी विजयकुमार पाटील म्हणाले, कोल्हापूर जिल्हा सोडून इतर जिल्ह्यातून शक्तिपीठ महामार्गाला विरोध नसल्याचे भासवण्यात येत आहे. मात्र सोलापूर जिल्हातूनही आमचा शक्तिपीठ मार्गाला विरोध आहे. त्यामुळे सरकारने दिशाभूल करू नये. असे सांगितले. आमच्या जमिनी आमदारांच्या बापाच्या आहेत काय? असा परखड सवालही त्यांनी केला.

परभणी येथील शेतकरी शांतिभूषण कचवे यांनी शक्तिपीठ महामार्ग लादू नका अन्यथा शेतकऱ्यांचा उद्रेक होईल, असा इशारा दिला. सांगली येथील घनशाम नलवडे यांनी शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करणारा हा महामार्ग असल्याचे सांगितले. हिंगोली येथील सूरज माळवाड यांनी देखील हिंगोली जिल्ह्यातून आमचा विरोध असल्याचे सांगितले. नांदेड येथील कचरू मुढळ यांनी शक्तिपीठ महामार्ग लादल्यास आम्ही प्राणाचे बलिदान देऊ असा इशारा दिला. धाराशिवनगर येथील संभाजी फडतारे यांनी आम्ही आई वडिलांच्या डोळ्यात अश्रू पाहू शकत नाही. शक्तिपीठ रद्द करा, अशी मागणी केली.

या बैठकीला आमदार जयंत आसगावकर, कॉम्रेड शिवाजी मगदूम, शेतकरी संघाचे संचालक सर्जेराव देसाई, बीडचे शेतकरी लालासाहेब शिंदे, हिंगोलीचे बापूराव ढेरे, नांदेडचे सुभाष मारेलवार, विक्रांत पाटील किणीकर, गोकुळ संचालक प्रकाश पाटील, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शशिकांत खोत, बिद्री कारखान्याचे संचालक आर एस कांबळे, उत्तम सावंत यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अजित पवार सातत्याने त्यांना वाचवत आहेत - करुणा शर्मांचा हल्लाबोल



**मुंबई** : मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर सध्या चहूबाजूंनी टीका व आरोप केले जात आहेत. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे आणि त्यांच्या खात्यावर आरोप केले होते. मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रस्ताव पास न होताच धनंजय मुंडे यांनी टेंडर काढले असा आरोप अंजली दमानिया यांनी केला आहे. आता यानंतर करुणा शर्मा यांनी देखील धनंजय मुंडे यांच्यावर हल्लाबोल केला आहे. अजित पवार धनंजय मुंडे यांना वाचवत असल्याचा दावा देखील करुणा शर्मा यांनी केला आहे.

एका वृत्तवाहिनीशी बोलताना करुणा शर्मा म्हणाल्या, मस्साजोग प्रकरणी ज्याप्रकारे सुप्रिया सुळे यांनी लक्ष दिले आहे. त्याच प्रकारे त्यांनी मला कलेक्टर कार्यालयात वाल्मीक कराड याने कलेक्टर समोर आणि मंत्री धनंजय मुंडे समोर मारहाण केली, त्याचे सीसीटीव्ही उपलब्ध करून द्यावेत अशी विनंती केली आहे. यासोबतच मुंडेंनी ज्या लोकांच्या जमिनी हडपल्या आहेत, त्या सोडवून देण्यासाठी मदत करावी याबाबत चर्चा केली आहे.

पुढे बोलताना करुणा शर्मा म्हणाल्या, धनंजय मुंडेंनी खूप भ्रष्टाचार केला आहे. अंजली दमानिया सगळी प्रकरण हळूहळू बाहेर काढतील. परंतु अजित पवार सातत्याने त्यांना वाचवत आहेत. लोकांच्या मतांचा गैरवापर करणे सध्या सरकारकडून सुरू आहे. पंकजा मुंडे यांच्यावर धनंजय मुंडे यांनी चिक्की घोटाळ्याचा आरोप केला. त्यानंतर लोकांनी पंकजा मुंडे यांना नाकारले, परंतु तरी देखील आता त्या मंत्रिमंडळात आहेत. वाल्मीक कराडने मारहाण केली. आता तो जेलमध्ये सडतोय. आता धनंजय मुंडेंची देखील तीच अवस्था होणार आहे. यांनी आत्तापर्यंत ३ हजार वंजारी लोकांवर खोटे एफआयआर दाखल केले आहेत. अजित पवार यांच्यावर माझा विश्वास नाही कारण ते ऐकत नाही. अंजली दमानिया यांनी पुरावे दिले मात्र त्यांनी काही केलेच नाही.

धनंजय मुंडेंचा राजीनामा आधीच झाला असता, कारण शरद पवारांनी मला ४ ते ५ वेळा फोन करून बोलवलं होतं. परंतु अजित पवारांनी काही तरी केलं आणि शरद पवार साहेबांनी मला वेळ दिला नाही, असा मोठा गौप्यस्फोट देखील करूणा शर्मा यांनी केला आहे. या पूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील धनंजय मुंडे यांना वाचवत असल्याचा दावा करुणा शर्मा यांनी केला होता.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २१ फेब्रुवारी २०२५


## पारंपरिक वेषभूषा आणि मैदानी खेळ सादरीकरण आणि रॅलीने शिवजन्मोत्सव साजरा



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात शिवजयंती निमित्त श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या आसनाधीष्टीत पुतळ्याचे पूजन आणि शिवआरती भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल शिवाजीराव मोरे यांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर जाऊ ब्रिगेडच्या महिलांनी जिजाऊ वंदना सादर केली. यावेळी भारत शिक्षण संस्थेचे संचालक राजेंद्र माने, रमेश बिराजदार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांची उपस्थिती होती. महाविद्यालयाच्या एनसीसी विभागातील शस्त्रांच पूजन करून युवकांनी, विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी लाटी -काठी आणि तलवारबाजीचे तसेच पारंपरिक वेशभूषेचे सादरीकरण केले. महाविद्यालयाच्या संगीत विभागाच्या वतीने शिव गीतांचे सादरीकरण केले. शहरातील जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड आणि मराठा सेवा संघ महिला आणि पदाधिकारी, तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक, विद्यार्थी- विद्यार्थिनी, प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रॅलीचा शुभारंभ बाळासाहेब माने, शांतकुमार मोरे, अनिल सगर, भास्कर वैराळ अमर देशेटवार, पत्रकार अंबादास जाधव, प्रा व्ही एम पाटील, अंबादास जाधव, उपप्राचार्य डॉ विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ पद्माकर पिठले, उपप्राचार्य गुंडा बापू मोरे,पर्यवेक्षक शैलेश महामुनी, प्रबंधक राजकुमार सोनवणे, कार्यालयीन अधीक्षक नितीन कोराळे डॉ डी एस चितमपल्ले यांच्या उपस्थितीमध्ये झाला. या रॅलीचा समारोप श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे करण्यात आला.

यावेळी घेतलेल्या लाठी-काठी स्पर्धेमध्ये अजिंक्य राजे अमोल पाटील यांनी प्रथम क्रमांक, तर द्वितीय क्रमांक छावा ग्रुपच्या रफिक शेख यांच्या चिमुकल्याणी पटकावला. तर तिसरा क्रमांक गौरव कटके या विद्यार्थिनीनी मिळवला. पारंपरिक वेशभूषा स्पर्धेमध्ये श्री छत्रपती शिवरायांच्या वेशभूषेतील तेजस दंडगे यास प्रथम क्रमांक, द्वितीय क्रमांक जिजाऊच्या वेशभूषेतील कु. माधुरी अगडे आणि कु. विद्या सधाने, तर तिसरा क्रमांक कु. ऋतुजा जीवनगे यांना देण्यात आला. मावळ्याच्या वेशातील विशेष पुरस्कार सुशील सूर्यवंशी यांना तसेच प्राथमिक शालेय स्तरावरील उत्तेजनार्थ बक्षीस कु स्वराली बिराजदार आणि कु मानसी घोडके या चिमुकलीना देण्यात आला. श्री अमोल पाटील यांनी सादर केलेल्या दांड पट्ट्याला विशेष प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. लाठी -काठी दांडपट्टा आणि तलवारबाजी अशा मराठमोळ्या मैदानी खेळाची जनजागृती गावागावातील तरुण आणि तरुणींमध्ये व्हावी आणि सक्षम तरुण व्हावे. यासाठीच या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमधील यशस्वी स्पर्धकांना रोख बक्षीस आणि प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहे. असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले यांनी केले आहे.

यावेळी जॉब ब्रिगेडच्या जिजाऊ ब्रिगेडच्या शिवमती सुनंदाताई माने मंजुषा चव्हाण रेखाताई पवार संध्याताई शिंदे तसेच जिजाऊ ब्रिगेडच्या महिलांनी व युवतीने शिवरायांच्या पालखी आणि घोड्यासह मिरवणुकीत मोठा सहभाग घेतला.या कार्यक्रमाच आभार प्रदर्शन शांतकुमार मोरे यांनी केले.

## सुशीलादेवी देशमुख विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर येथील सुशीलादेवी देशमुख माध्यमिक विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. बी. जे. पहिलवान यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. आर. पी. चव्हाण हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते छ.शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पाळणा , पोवाडे, गीते आणि भाषणे सादर केली.

प्रमुख पाहुणे श्री. चव्हाण यांनी श्री. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी मु.अ. श्री. पहिलवान यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अमृता राठोड व कु. अनुष्का जैस्वाल यांनी केले तर आभार प्रदर्शन चि. राजदीप ढगे याने केले. या वेळी विद्यालयाचे सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.रमाकांत छडीदार

## अमरावती येथील मठात अल्पवयीन मुलीवर बलात्कार



**अमरावती :** अमरावती येथील एका मठात सेवाधारी अल्पवयीन मुलीवर मठ प्रमुखासह एका मुनीने अनेकवेळा सामूहिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. रिद्धपूर येथील माठात बुधवारी ही घटना उघडकीस आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे या गुन्ह्यात अल्पवयीन मुलीच्या मावशीने आरोपींना सहकार्य केले आहे. या प्रकरणी शिरखेड पोलिसांनी बलात्कार व बाललैंगिक अत्याचाराचा गुन्हा नोंदवत अल्पवयीन मुलीच्या मावशीसह मठ प्रमुख व एका मुनीला अटक केली आहे.

आरोपी मठ प्रमुख सुरेंद्रमुनी तळेगावकर (वय ७५), मठातील मुनी आरोपी बाळासाहेब देसाई (वय ४०) व आरोपी महिला अशी अटक झालेल्या आरोपींची नावे आहेत. या अल्पवयीन मुलीचे कुटुंबीय सर्वच एका पंथाचे आहेत आणि ते वेगवेगळ्या मठात राहतात. संबंधित मुलगी गेल्या वर्षभरापासून रिद्धपूर येथील सुरेंद्रमुनी तळेगावकर याच्या मठात मावशीसोबत राहत होती. ती सेवक म्हणून गत एक वर्षापासून मठातच मुनींची सेवा करीत होती.

मठप्रमुख सुरेंद्र तळेगावकर याने २ एप्रिल २०२४ ला तिच्या मावशीच्या मार्फत मुलीला त्याच्या तळघरातील खोलीत बोलाविले आणि तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर मठातच राहणाऱ्या बाळासाहेब देसाई यानेसुध्दा तिच्यावर अत्याचार केला. यावेळी मुलीने विरोध केला तेव्हा तिच्या गळ्यावर पाय ठेवून कोणाला काही सांगितले तर जीवे मारून टाकेल, अशी धमकी देण्यात आली. घडलेला प्रसंग पीडित मुलीने मावशीला सांगितला, मात्र तिने देखील त्या कृत्याचे समर्थन केले व कोणाला काही सांगू नको असे बजावले. तसेच या मुलीला मठाच्या बाहेर देखील जाऊ दिले जात नव्हते. तसेच मावशी बळजबरी तिला सुरेंद्र मुनीकडे तळघरात पाठवायची आणि दोन्ही मुनी तिच्यावर बलात्कार करीत होते. तर तिची मावशी त्यांना सहकार्य करीत होती.

वारंवार या अल्पवयीन मुलीवर बलात्कार होत राहिले व त्यात ती गर्भवती असल्याचे लक्षात आले. ही गोष्ट लक्षात येताच तिची मावशी व मठातील इतर मुनी व दीक्षा घेतलेल्या महिलांनी हा प्रकार दाबण्याचा प्रयत्न केला. एकदा मुलीचे वडील मठात तिला भेटायला आले तेव्हा आपली मुलगी गर्भवती असल्याचे त्यांच्या लक्षात आले व तातडीने त्यांनी पोळी ठाण्यात धाव घेतली. या प्रकरणी शिरखेड पोलिसांनी वरिष्ठांना माहिती दिली व मुलीची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तपासात मुलगी गर्भवती असल्याचे निष्पन्न होताच पोलिसांनी मठात धाव घेतली. मुलीच्या तक्रारीवरून बलात्कार व बाल लैंगिक अत्याचाराचा गुन्हा नोंदवून सुरेंद्र तळेगावकर, बाळासाहेब देसाई आणि पीडितेची मावशी यांना अटक केली आहे. पुढील तपास शिरखेड पोलिस करीत आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २१ फेब्रुवारी २०२५


## निवडक साहित्यरुपांची आस्वादक समीक्षा म्हणजे साठोत्तरी साहित्य : आकलन आणि आस्वाद – डॉ. प्रभाकर गायकवाड




डॉ. प्रेमला मुखेडकर यांचा 'साठोत्तरी साहित्य : आकलन आणि आस्वाद' हा मराठी साहित्य विश्वातील महत्त्वपूर्ण समीक्षात्मक ग्रंथ आहे. प्रस्तुत ग्रंथ हा कविता, कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, व ललित गद्य इत्यादी साहित्य प्रकारातील निवडक पुस्तकांचा परिचय, माहिती, वैशिष्ट्ये, वेगळेपण, आशय व अभिव्यक्तीचा साकल्याने विचार केलेल्या समीक्षात्मक लेखनाचा दस्तऐवज आहे. सदर ग्रंथामुळे साहित्यकृतीचे आकलन होण्यास मदत होते. हे पुस्तक वाचताना लेखिकेच्या चौफेर वाचनापासून ते चिकित्सक व निवडक वाचन प्रवास हा एक वैचारिक जीवन समृद्ध करणारा होत गेल्याचे प्रत्यंतर अधोरेखित होते. साहित्यातून व्यक्त समाज वास्तवाचे प्रतिबिंब लेखिकेच्या मनात काहूर, अस्वस्थता उमटवत होते. त्यांची सूक्ष्म निरीक्षण शक्ती, अनभुवसमृध्दता त्याचीच शोधपरिणिती म्हणजे हा लेखसंग्रह ग्रंथ रूपाने प्रकाशित झाला आहे. मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राचा सांगोपांग ठाव घेणा-या साहित्यकृती लेखिकेने निवडल्या आहेत. लेखिकेने त्या त्या साहित्य प्रकाराची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन समीक्षात्मक लेखनात क्लिष्टता, बोजडपणा येऊ न देता मराठी वाचकांना समीक्षेकडे पाहण्याची एक नवजीवनदृष्टी तसेच रसास्वाद घेण्याचा परिपाठ या पुस्तकाने घालून दिला आहे. अतिशय साध्यासोप्या आणि सरळ भाषा, ओघवत्या शैलीमुळे वाचक त्यात गुंतून पडतील. तर्क व बुध्दिनिष्ठ पध्दतीने साकारलेला हा वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथ वाड्मयीन मूल्यांची अधिक चाड असणा-या जिज्ञासूंनी जरूर वाचावा, असा आहे.

प्रा. मुखेडकर यांनी साठोत्तरी साहित्यातील साधारणपणे इसवी सन २००० नंतरच्या साहित्याची अधिक प्रमाणात निवड केली आहे. सुप्रसिद्ध निसर्ग कवी विठ्ठल वाघ, पी. विठ्ठल, स्वाती शिंदे, सारिका उबाळे, शिवाजी हुसे यांच्या काव्यसंग्रहाचे रसग्रहण केलेले आहे. तर प्रसिद्ध कवयित्री अनुराधा पाटील यांच्या कवितांचा हिंदी अनुवाद तसेच समकालीन आदिवासी कविता, मुस्लीम मराठी कविता इत्यादींवर अतिशय अभ्यासपूर्ण समीक्षात्मक लेख या ग्रंथात आहेत.

कथात्मक साहित्यातील अकरा कलाकृतींचा समावेश आहे. 'मोराची बायको' या किरण येले यांच्या या कथासंग्रहावर समकालीन जीवनातील नात्याचा वेध घेणारी कथा कशी आहे, याचे विवेचन आहे. सुप्रसिद्ध जयंत नारळीकर यांची 'प्रेषित' ही एक विलक्षण विज्ञानावर आधारित प्रसिद्ध कादंबरी आहे. त्यामध्ये एकूणच साहित्यातून आधुनिक विज्ञान शोधांमुळे मानवी जीवन कस व्यापून बदलते याच्या सविस्तर चित्रणाचा वेध घेतलेला आहे. त्याबरोबरच पहिल्या आदिवासी कादंबरीकार नजुबाई गावित यांच्या 'तृष्णा' या कादंबरीची मीमांसा या पुस्तकात केलेली आहे. स्पीड पोस्ट, जोहार,फेसाटी, खडकवासला, टिश्यू पेपर, बुर्गांट इत्यादी निवडक साहित्य कृतीमध्ये मानवी वृत्ती-प्रवृत्तींचा ग्रामीण व शहरी जीवन विषयक संघर्ष, तत्त्वज्ञान मांडणाऱ्या अतिशय वास्तववादी महत्त्वपूर्ण कादंबऱ्यांवर या ग्रंथात समीक्षात्मक लेखन आलेले आहे. त्याबरोबरच समकालीन आदिवासी कादंबरी, मराठी कादंबरीतून आलेला पर्यावरण विषयक विचार हे ही लेख अतिशय महत्त्वपूर्ण आहेत. तसेच चरित्र, आत्मचरित्र या साहित्य प्रकारात आधुनिक भारताच्या शिल्पकार प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांचे पुपुल जयकर यांनी लिहिलेले चरित्र, सुप्रसिद्ध लेखक प्र. के. अत्रे यांच्या पत्नी सुधा अत्रे यांनी लिहिलेले 'गोदातरंग' हे आत्मकथन, मुस्लिम समाजसुधारक हमीद दलवाई यांच्या पत्नी मेहरूनिसा दलवाई यांनी लिहिलेले 'मी भरून पावले आहे' हे आत्मकथन, विमल मोरे यांचे 'तीन दगडाची चूल', मुरहरी केळे यांचे 'नाणी' या चरित्र ग्रंथाचे केलेले परीक्षण प्रस्तुत ग्रंथात प्रा. मुखेडकर यांनी समाविष्ट केले आहे.

पुस्तकाच्या शेवटी ललित संग्रहावरील दोन लेख आहेत. डॉ. छाया महाजन यांच्या 'गगन जीवन तेजोमय' या ललित संग्रहावर एक दीर्घ लेखाचा समावेश करण्यात आला आहे तर 'ललिता गादगे यांचे ललित लेखन' या लेखात ललिता गादगे यांनी लिहिलेल्या दोन ललितलेख संग्रहातील ललित गद्यावर अभ्यासपूर्ण लिहिलेल्या विस्तारित दीर्घ लेखांचा समावेश प्रस्तुत ग्रंथात आहे.

प्रस्तुत ग्रंथाला सुप्रसिद्ध लेखिका डॉ. श्रुती श्री वडगबाळकर यांची सखोल, सविस्तर अशी महत्त्वपूर्ण प्रस्तावना आहे. त्यातून प्रा. मुखेडकर यांनी केलेल्या समीक्षेचा परामर्श उजागर होतो. सुप्रसिद्ध लेखिका ललिता गादगे यांनी प्रभावीपणे व संक्षिप्त पाठराखण केली आहे, ज्यातून पुस्तकाचा हेतू उलगडतो. पाठराखणकारांचे प्रतिपादन आहे की, “विविध वाड्मय प्रकारातील बलस्थानं; सौंदर्यस्थळे; त्यातून अभिव्यक्त झालेली वाड्मयमूल्ये, त्या साहित्य प्रकाराची वैशिष्ट्ये लेखिकेने समीक्षेचा बोजडपणा टाळून समर्थपणे अधोरेखित केली आहेत. तत्कालीन सामाजिक वास्तव, अटळ असे संघर्ष, जीवन जाणिवा, जीवनमूल्य संबंधित साहित्यकृतीतून कशी आविष्कृत झाली आहेत याचा सहज, साध्या, प्रवाही शब्दात लेखिकेने अचूक वेध घेतला आहे. आस्वादक समीक्षेच्या अभ्यासकांसाठी उपयुक्त ठरावे असे हे लेखिकेचे विविध साहित्य रूपाचे 'आकलन' वाङ्मयीन वाचन संस्कृतीलाही पूरक ठरणारे आहे यात शंका नाही.” प्रस्तुत ग्रंथ सोलापूर येथील गौरव साहित्यालयाने प्रकाशित केला आहे. आधुनिक मराठी वाड्मयाचा अभ्यास करणाऱ्या संशोधक, अभ्यासकांसाठी तसेच विविध साहित्यकृतीचा रसास्वाद घेणाऱ्या वाचकांसाठी हा ग्रंथ नक्कीच उपयुक्त सिध्द होईल म्हणूनच त्याचे महत्त्व अधिक !

**पुस्तकाचे नाव:- साठोत्तरी साहित्य : आकलन आणि आस्वाद**
**लेखिका:- प्रा. डॉ. प्रेमला मुखेडकर**
**प्रकाशक – गौरव साहित्यालय , सोलापूर**
**पृष्ठ : १९९ मूल्य : ३५०**

## अंजली दमानिया यांनी केलेले दावे संपूर्णपणे चुकीचे - धनंजय मुंडेंचा पलटवार



**मुंबई** : मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पत्रकार परिषद घेत गंभीर आरोप केले होते. बॅटरी ऑपरेटेड स्प्रे पंप आणि सोलार लाईट ट्रॅप संदर्भात घोटाळा झाल्याचा आरोप अंजली दमानिया यांनी केला होता. यावर मंत्री धनंजय मुंडे यांनी ट्विट करत प्रत्युत्तर दिले असून अंजली दमानिया यांचे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत.

धनंजय मुंडे म्हणाले, बॅटरी ऑपरेटेड स्प्रे पंप आणि सोलर लाईट ट्रॅप यांचा पुरवठा करण्याबाबत निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयावर अंजली दमानिया यांनी केलेले दावे हे संपूर्णपणे चुकीचे, खोटे व केवळ माझी बदनामी करण्याच्या हेतूने प्रेरित आहेत, असा आरोप धनंजय मुंडे यांनी केला आहे.

पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले, मुख्य सचिव तथा मंत्रिमंडळ सचिव श्रीमती सुजाता सौनिक यांनी दि. ३० सप्टेंबर २०२४ रोजी माननीय मुख्यमंत्री महोदयांची मान्यता झाल्यानंतर दि. २३ सप्टेंबर २०२४ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीचे इतिवृत्त निर्गमित केलेले आहे. त्यामध्ये कृषी विभागाच्या खरेदी व थेट पुरवठ्याला मान्यता देण्यात आलेली आहे. तो पेपर सोबत पोस्ट करत आहेत.

धनंजय मुंडे म्हणाले ज्याला त्या (अंजली दमानिया) तारीख नसलेले सहीचे पत्र म्हणतात ते वास्तविकत: मंत्री, कृषी म्हणून स्वत:च्या विभागाच्या सचिवांना निर्गमित केलेले टिपण आहे. टिपणावर दिनांक टाकण्याचा प्रघात नाही तथापि सदर टिपणावर ते ज्याला मार्क केलेले आहे त्याची स्वाक्षरी व त्याला प्राप्त झाल्याचा व कार्यासनात प्राप्त झाल्याचा दिनांक नमूद असतो. विशेष म्हणजे या शासन निर्णयान्वये व मंत्रिमंडळ निर्णयान्वये मान्यता प्राप्त झालेली खरेदी अद्यापही झालेली नाही. त्याची प्रक्रिया सुरू आहे.

मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही तातडीने करण्यासंदर्भात विभागाला टिपणाद्वारे अथवा इतर प्रकारे निर्देश देण्याचे अधिकार भारतीय राज्यघटनेच्या कलम १६६ खाली बनविण्यात आलेल्या कार्य नियमावलीतील तरतुदीनुसार संबंधित मंत्र्यांना आहेत. दमानिया ताई यांनी नेहमीप्रमाणे अर्धवट कागदपत्रांच्या आधारे जे आरोप केलेले आहेत ते संपूर्णत: खोटे व फक्त मीडिया ट्रायल करण्यासाठी आहेत.

या संदर्भात आम्ही खोटी कागदपत्रे तयार केल्याची त्यांना खात्री असेल तर त्या प्रकारची रीतसर तक्रार त्यांना योग्य त्या मंचावर, प्राधिकरणाकडे नोंदविण्याची मुभा आहे. पण त्या तसे न करता केवळ घोटाळे, अमुक इतके कोटी वगैरे असे भडक शब्द वापरून फक्त मीडिया ट्रायल रन करणार. यासंदर्भात त्यांनी जाणीवपूर्वक केलेल्या बदनामीकारक बाबींबद्दल त्यांचे विरुद्ध फौजदारी याचिका दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सोबत मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयाचे कागदपत्रही जोडले आहेत. यातील आपल्या सोयीचे कागदपत्र स्वतः अंजलीताई दमानिया यांनीही माध्यमाना गुगल ड्राईव्हच्या माध्यमातून उपलब्ध करून दिले आहेत, ती कागदपत्र तपासली तरीही २३ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या बैठकीत हा निर्णय झाला होता हे लक्षात येईल, असे म्हणत पुढे बाकी काय खोटे बोल पण रेटून, असा टोला देखील धनंजय मुंडे यांनी लगावला आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २१ फेब्रुवारी २०२५

# फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची ९४ वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न.



**छत्रपती संभाजीनगर :** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) यांच्या संयुक्त विद्यमाने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर येथे बुद्ध तत्त्वज्ञानामुळे जग युद्धापासून दूर व शांततेच्या जवळ येईल. या डॉ. आंबेडकरांच्या विधानाच्या ७२ व्या वर्धापनदिनानिमित्त सदरील विषयावर ९४ वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा १६ फेब्रुवारी २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी.बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, बुद्ध तत्त्वज्ञानात मानवीय विकास अंतर्भूत असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनात त्याचे आचरण केले पाहिजे. करिता जगातील सर्व धर्माचा तुलनात्मक अभ्यास करून त्यातील सामायिक मानवतावादी मूल्यांची जोपासना केली पाहिजे. जेणेकरून समाजाला सुद्धा मानवतावादाकडे वळविता येईल. परिणामी समतामुलक समाजाची निर्मिती करता येईल. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अपेक्षेप्रमाणे या विचारांच्या उद्देशपूर्तीसाठी बुद्धिष्ट सेमिनरी चालविली पाहिजे. त्यातून पुढे आलेल्या विचाराला समाज जीवनात रुजविण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत. यांच्या अंमलबजावणीसाठी जीवनाच्या विविध क्षेत्रातील महत्त्वपूर्ण पदावर याच विचारांच्या व्यक्ती असणे आवश्यक आहे. म्हणून तर बाबासाहेब आंबेडकरांनी १६ फेब्रुवारी १९४६ ला मा-याच्या जागा काबीज करा असा संदेश दिला होता. त्यावर गांभीर्याने विचार करण्याची आजतरी नितांत गरज आहे. जेणेकरून २५ नोव्हेंबर १९५६ ला सारनाथ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, माणसामाणसातील संबंध प्रेम, करुणा या तत्वानुसार जोडणा-या बौद्ध धर्माचा मध्यवर्ती सिद्धांत समता आहे. म्हणून जगाला युद्धापासून परावृत्त करण्यासाठी समतेवर आधारित समतामुलक समाजाची निर्मिती करावी लागेल. जेणेकरून जगात शांतता प्रस्थापित होईल. ती टिकविण्यासाठी याच विचारांच्या व्यक्ती मा-याच्या जागेवर विराजमान केल्या पाहिजेत.

समाज जीवनात स्वतःला बुद्धाचे अनुयायी म्हणणा-या व्यक्ती सुद्धा आचरण मात्र ब्राह्मणवादाचे करीत असतात. म्हणून तर ब्राह्मणवाद फोफावत चालला आहे. तरी गैर राजनीतिक मूळ मजबूत करण्यासाठी आपण समाज जीवनात प्रयत्न करीत राहिले पाहिजे.

प्रमुख वक्ते प्रा. अरुण कांबळे म्हणाले की, योद्धे फितूर होत असल्याने चमचा युग उदयास आले आहे. म्हणून लोकशाहीच्या चारही स्तंभावर बुद्ध तत्त्वज्ञानाने प्रभावीत असणाऱ्या व्यक्तींची नियुक्ती केली पाहिजे. चंद्रकांत हंडोरे यांनी त्यांच्या कार्य काळात आंबेडकर भवन बांधण्याची प्रक्रिया संपूर्ण महाराष्ट्रात राबविली. तशी प्रतिके निर्माण करण्यासाठी आपण सुद्धा सजग राहिले पाहिजे. सप्त्यात महाराज ब्रेनवाश करतात. जग बुद्धाला स्विकार करीत असले, तरी मात्र आपल्या देशातील नागरिकांना बुद्ध माहित पडू दिले जात नाही. ही भारतीय समाज प्रबोधनाची शोकांतिकाच म्हणावी लागेल. सृष्टीला नष्ट होऊ द्यायचे नसेल तर मात्र आता बुद्धाला स्विकारलेच पाहिजे. बुद्ध विचारात जगाला तारण्याची शक्ती आहे.

याप्रसंगी इंजिनिअर किशोर पाटील उद्घाटनपर मार्गदर्शन करताना म्हणाले की, व्यवस्थेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी आपण मा-याच्या जागा काबीज केल्या पाहिजेत. दैववादाला बळी पडणारे उच्च शिक्षित सुद्धा समाजाला उन्नती कडे घेऊन जाऊ शकणार नाहीत. विदेशवारी पूर्ण करून आलेल्यांच्या सत्काराप्रित्यर्थ मार्गदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध विचार वृद्धींगत करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन केले होते.

याप्रसंगी प्राचार्य विलास कटारे म्हणाले की, युद्धावर बुद्ध हाच एकमेव उपाय आहे. उद्योजक मिलिंद बागूल म्हणाले की, जपान हे छोटेसे राष्ट्र आहे ज्यांनी हिरोशिमा व नागासाकी वरील अणू हल्ल्यात बेचिराख झाल्यावर सुद्धा बुद्ध तत्त्वज्ञानामुळे अल्पावधीतच फिनिक्स पक्षा प्रमाणे भरारी घेतली आहे. टी. एन. थोरात म्हणाले की, १३ ऑक्टोबर १९३५ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्मात जन्माला आलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही अशी घोषणा येवले मुक्कामी केली होती. गोविंद कांबळे म्हणाले की, बुद्ध ही एक अवस्था आहे, ती आपण ती आपण मिळविली पाहिजे. महादेव डांबरे म्हणाले की, लॅटरल पद्धतीने पदे भरण्यावर प्रतिबंध आणला पाहिजे.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर स्टडी सर्कलच्या वतीने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सुत्रसंचालन महादेव डांबरे, प्रास्ताविक एड. विलास रामटेके व आभार गोविंद कांबळे यांनी व्यक्त केले. यावेळी टी. एन. थोरात यांनी दीक्षा आम्हा दिली भिमाने हे गीत म्हटले तर गोविंद कांबळे यांनी चला निळ्या पाखरांनो नागसेनवनाकडे हे गीत सादर केले. या कार्यशाळेला उद्योजक मिलिंद बागूल, इंजिनिअर किशोर पाटील, महादेव डांबरे, टी. एन. थोरात, प्रा. विलास कटारे, गोविंद कांबळे, रमाबाई कांबळे, विराज कांबळे, एड. विलास रामटेके, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २१ फेब्रुवारी २०२५


# कोळसा भट्टीवर मुंबईत महापालिकेकडून बंदी



**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजधानीत वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी काही उपाययोजना मुंबई महानगरपालिकेकडून केले जात आहेत. यात आता मुंबई येथे बेकरीमध्ये लाकडी आणि कोळसा भट्टी वापरण्यास मुंबई महापालिकेने बंदी घातली आहे. मात्र, ही बंदी उठवण्याची मागणी केली जात आहे.

बेकरी मालक तसेच भाजपचे माजी नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी मुंबई महापालिकेने घातलेली ही बंदी उठवण्याची मागणी केली आहे. यावर पर्याय निघाला नाही तर मुंबईत वडापावसाठी लागणाऱ्या पावाचा पुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता बेकरी असोसिएशनने वर्तवली आहे. तसेच मुंबईतील बेकरी आणि इराणी कॅफे यांना नियमातून वगळावे व पाककलेचा वारसा जपण्यासाठी वारसा दर्जा द्यावा, अशी मागणी माजी नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी मुख्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे केली आहे.

इंडिया बेकर्स असोसिएशनचे अध्यक्ष खोदादाद इराणी यांच्या म्हणण्यानुसार, मुंबई महापालिकेच्या निर्देशानुसार लाकडी भट्टी बंद करून इलेक्ट्रिक भट्टीचा वापर करणे आर्थिक दृष्ट्या परवडणारे नाही. याशिवाय या इलेक्ट्रिक भट्टीचा वापर करून मोठ्या प्रमाणावर पाव इतर बेकरी प्रॉडक्ट तयार करणे शक्य होणार नाही. तसेच मुंबई महापालिकेने दुसरा पर्याय दिला आहे तो एलपीजी गॅस सिलेंडरचा. किमान दहा एलपीजी सिलेंडरचा वापर हा बेकरी साठी रोज होईल, सिलेंडरचा वापर बेकरी प्रॉडक्ट तयार करण्यासाठी झाल्यास जीवित आणि वित्तहानी होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो, कारण अनेक बेकरी या रहिवासी भागात आहेत, असेही इराणी यांनी म्हटले आहे.

पीएनजी गॅसचा वापर बेकरीमध्ये करण्यात आला तर पीएनजी गॅस पुरवठा करणाऱ्या महानगर गॅसकडे अशा प्रकारचे इन्फ्रास्ट्रक्चर नाही. लाकडी भट्टीचा वापर थांबवून इलेक्ट्रिक किंवा एलपीजी पीएनजी गॅसचा वापर करायचा झाल्यास उपकरणे बसवण्यासाठी किमान एक महिना बेकरी मालकांना लागेल. कमीत कमी दहा ते पंधरा लाख रुपये खर्च येईल, त्यासाठी राज्य सरकारने अर्थसहाय्य करावे, अशी मागणी बेकरी असोसिएशनकडून करण्यात आली आहे.

एकीकडे बेकरी मालकांचा विरोध सुरू असताना दुसरीकडे उद्योजक व लेखक प्रफुल्ल वानखडे यांनी महापालिकेच्या निर्णयाला दुजोरा दिला आहे. प्रफुल्ल वानखडे म्हणाले, लाकडी भट्ट्यांचा वापर बंद करून जर इलेक्ट्रिक किंवा गॅसच्या भट्ट्या वापरल्या तर काय नफा तोता होतो हे सुद्धा आम्ही समजून घेतले आहे. काही नवीन बेकरी आहेत ज्या लाकडी भट्ट्यांचा वापर करत नाहीत. मात्र, यशस्वीरित्या व्यवसाय करतात अशी सुद्धा उदाहरण आहेत. मात्र या सगळ्याची समजूत किंवा याबद्दल जागरूकता निर्माण करणे सुद्धा महत्त्वाचा आहे.

दरम्यान, मुंबईतील वायू प्रदूषण दिवसेंदिवस वाढत जात आहे. त्यामुळे प्रदूषणाला आळा घालण्यासाठी आवश्यक ती सर्व पाऊले मुंबई महापालिका उचलत आहे. त्यात न्यायालयाच्या निर्देशानुसार मुंबई महापालिकेने बेकरी प्रॉडक्ट बनवताना होणाऱ्या लाकडाच्या आणि कोळसा भट्टीच्या वापरावर बंदी घातली असल्याने अनेक ठिकाणी बेकरी त्यासोबतच इराणी कॅफेला नोटीस पाठवून कारवाई करण्यात येत आहे.


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103

E-mail : sahilcomputer05@gmail.com

साहिल
कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

- डी.टी.पी.जॉब वर्क
- मराठी, हिंदी, इंग्रजी
- एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
- स्पायरल / हार्ड बाईन्डींग
- लॅमिनेशन
- कलर प्रिंट

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.


# धावत्या लोकलमध्ये तिघांवर चाकू हल्ला

**मुंबई :** कल्याण येथून दादरला जाणाऱ्या जलद लोकलमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. एका १९ वर्षीय तरुणाने तीन प्रवाशांवर चाकूने हल्ला केला आहे. किरकोळ कारणावरून या तरुणाने थेट चाकूने हल्ला केला असल्याची माहिती समोर आली आहे. धक्का लागण्याच्या अतिशय क्षुल्लक कारणावरून हा हल्ला झाला आहे.

कल्याण ते दादर या जलद लोकलमध्ये गर्दी होती. यात १९ वर्षीय शेख जिया हुसेन नामक तरुण प्रवास करत होता. कल्याण-डोंबिवली दरम्यान गर्दी असल्याने काही प्रवाशांचा त्याला धक्का लागला. या कारणावरून त्याने थेट तिघांवर चाकूने हल्ला केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेख जिया हुसेन याला उमऱ्याला उतरायचे होते मात्र जलद लोकल ही या स्थानकावर थांबत नसल्याचे त्याच्या लक्षात आले. यावेळी उतरण्यासाठी त्याने इतर प्रवाशांना धक्काबुक्की केली होती. याचे रूपांतर वादात झाले आणि पुढे त्याने थेट त्याच्याकडील चाकू काढून हल्ला करण्यास सुरुवात केली असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. शेख जिया हुसेन या तरूनवर डोंबिवली लोहमार्ग पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून त्याला अटक करण्यात आली आहे. तसेच जखमी झालेल्या तिघांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

मुंबई येथील लोकलमध्ये अनेक स्टंटबाजीचे प्रकार देखील पाहायला मिळतात. तरुण कुठल्या दिशेला जात आहेत असा प्रश्न समाजात उपस्थित होत आहे. गुन्हेगारीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होताना दिसत असून यात तरुण मुलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग दिसून येत आहे. लोकलमध्ये १९ वर्षीय तरुणाने केलेला चाकू हल्ला हे अत्यंत धक्कादायक असून यावर पोलिस प्रशासन काय कारवाई करणार तसेच अशा प्रकारांना आळा बसवण्यासाठी काय उपाययोजना केली जाते याकडे लक्ष असणार आहे.

# 'छावा'मध्ये इतिहासाचे विकृतीकरण - शिवानंद भानुसे यांचा आरोप




नुकत्याच प्रदर्शित झालेल्या छावा या चित्रपटात इतिहासाचे विकृतीकरण करण्यात आल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते शिवानंद भानुसे यांनी केला आहे. या चित्रपटात दाखवलेले काही प्रसंग चुकीच्या पद्धतीने दाखवल्याचे त्यांनी म्हटले आहे.

शिवानंद भानुसे म्हणाले-

"स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजीराजांवर छावा चित्रपट प्रदर्शित झाला. खूप अपेक्षा वाढल्या होत्या. परंतु प्रत्यक्ष चित्रपट पाहिल्यानंतर खूप मोठा अपेक्षाभंग झाला. वाईट वाटलं. कारण या चित्रपटांमध्ये इतिहासाची मोडतोड आणि इतिहासाचे विकृतीकरण केले गेले आहे. काही गोष्टी चित्रपटदृष्ट्या म्हणून आपण मान्य करू. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराणी सोयराबाई यांनीच औरंगजेबाचा मुलगा दुसरा अकबर याला पत्र लिहून संभाजीराजेच्या विरोधात कटकारस्थान केले. हे चुकीचे आहे. हे खोटे आहे. कारण अनाजी पंत आणि त्याच्या टीमने ते केलेलं होतं. हे स्पष्टीकरण येणं अपेक्षित होतं. त्याचबरोबर सिंह आणि संभाजी राजे यांच्यात केव्हाच लढाई झालेलं नाही. हे पण काल्पनिक आहे. आणि अत्यंत महत्त्वाचं म्हणजे छत्रपती संभाजी राजांचे मेहुणे गनोजी शिर्के यांनीच संभाजी राजांना पकडून दिलं. हे चुकीचं दाखवलेलं आहे. कारण इतिहासकार वा. शी. बेंद्रे पासून तर इंद्रजीत सावंतापर्यंत कोणत्याही इतिहासात त्या पद्धतीची नोंद नाही. छत्रपती संभाजी राजांना त्यांच्या दरबारातील ब्राह्मण कारकून किंवा रंगनाथ स्वामी व त्याचे 300 शिष्य यांनी पकडून दिलेले आहे. असे पुरावे इतिहासात आहे. हे दाखवणे अपेक्षित होतं. तसे न करता अशा पद्धतीचा चुकीचा व खोटा इतिहास नवीन पिढीसमोर नेऊन एक नेरेटिव्ह सेट केला जातोय की स्वराज्याचे दुश्मन गणोजी शिर्के होते. परंतु हे चुकीचे आहे. अशा पद्धतीचा इतिहास नवीन पिढी समोर जाणं योग्य नाही.